


सोलापूर महानगरपालिका कामगार
कल्याण जनसंपर्क विभाग
ई – न्यूजलेटर



# सोलापूर महानगरपालिका मिळकत कर विभागाकडून थकबाकीपोटी मिळकतीवर सिल

Volume IX Issue 15 Date 18-09-2023

1) सोलापूर महानगरपालिका मिळकत कर विभागाकडून आज दि.18/09/2023 रोजी मजरेवाडी पेठ 64 येथील ताजोद्दिन मोहिउद्दिन बेग व इतर तीन यांचे नांवे असलेल्या मिळकतीवर महंमदिया एज्यूकेशन ॲन्ड रिसर्च सोसायटी या संस्थेची प्राथमिक व माध्यमिक शाळा सन 2022-23 मधील र.रु. 20,53,815/- इतक्या थकबाकीपोटी माहे डिसेंबर,2022 मध्ये सिल करण्यात आली होती. तथापी मे.न्यायालयाच्या निर्देशानुसार सदर सिल काढून देण्यात आले होते. तसेच मे.न्यायालयाने सदर संस्थेस निकाल दिल्यापासू दोन आठवडयाचे आत ट्रस्ट ॲक्ट नुसार करामध्ये अधिनियमातील कलम 132 अंतर्गत सवलत मिळणेकामी प्रशासनाकडे अर्ज देणेबाबत निर्देश दिलेले होते. तथापी सदर संस्थेने असा कोणताही अर्ज आज अखेर प्रशासनाकडे सादर केलेला नसल्याने व थकबाकीही भरली नसल्याने, आज दि.18/09/2023 रोजी सदर संस्थेचे प्राथमिक व माध्यमिक प्रशालेच्या दोनही मुख्याध्यापकांचे कार्यालय तसेच स्टाफ रुम सिल करण्यात आले.

2) पाच्छा पेठ येथील मिळकतदार सौ. दुर्गा कारमपुरी यांचे नांवे असलेल्या मिळकतीमध्ये दुकानगाळे व गोडावून असून सन 2022-23 सालातील सुमारे र.रु4,42,627/- इतक्या थकबाकीपोटी सिल करण्यात आलेले होते. तथापी आज अखेर त्यांनी थकबाकी भरली नाही. उलट एका भाडेकरीने गोडावूनचे सिल काढून व्यवसाय सुरु केलेचे आढळून आले. सदर गोडावून दि.18/09/2023 रोजी पुन:श्च एकदा सिल करण्यात आले. याबाबत संबंधितावर फौजदारी गुन्हा दाखल करणेची कारवाई करणेत येणार आहे.

उपरोक्त प्रमाणे दोनही मिळकतीवर मा.आयुक्त, मा.उपायुक्त यांचे निर्देशानुसार मालमत्ता कर विभागाकडील अधिकारी व संबंधित पेठेचे कर्मचारी यांचे मार्फत कारवाई करण्यात आली.
सबब सर्व मिळकत कराची थकबाकीदार मिळकतदारांना पुन:श्च एकदा आवाहन करण्यात येते की, मिळकत कराची थकबाकी भरुन महानगरपालिकेस सहकार्य करुन थकबाकीपोटी होणारी कटू कारवाई टाळावी.

सहा.मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी



